'सत्या'चा अग्रलेख
पहिली महिला अंतराळवीर कल्पना चावला
नक्की वाचा पान २ वर...

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड,
कोकण आणि नाशिक येथून प्रकाशित होणारे दैनिक
आपला विभाग, आपल्या बातम्या

# महानगरी टाइम्स

प्रेरणास्थान

संस्थापक संपादक
स्व.सदाशिव केरकर

मुंबई । गुरुवार , ०१.०२.२०२४, ■ वर्ष १८ ■ अंक १११ ■ पाने ४ ■ किंमत दोन रुपये ■ RNI No. MAHMAR/2004/1875 , Email:mahanagritimes@gmail.com

# 'सरकारने काढलेली मराठा आरक्षणाची अधिसूचना अंतिम निर्णय नाही...'

## चंद्रशेखर बावनकुळे यांचं मोठं वक्तव्य

■ प्रतिनिधी । मुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची सगेसोयरेबाबतची मागणी मान्य केली आहे. त्यामुळे ज्या मराठ्यांच्या ओबीसी नोंदी सापडतील त्यांच्या सगेसोयऱ्यांनाही आता कुणबी प्रमाणपत्र मिळणार आहे. महाराष्ट्र सरकारकडून याबाबत अधिसूचनादेखील काढण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनोज जरांगे यांना याबाबतचा अध्यादेश देऊन त्यांचं उपोषण सोडवलं होतं. पण सरकारच्या या अधिसूचनेवर आधी मंत्री छगन भुजबळ यांच्याकडून आक्षेप घेण्यात आला होता. त्यानंतर आता भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. ङ्कसरकारने सगेसोऱ्यांबाबत काढलेली अधिसूचना अंतिम निर्णय नाहीङ्क, असं भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले आहेत. ङ्कअधिसूचनेवर सरकारने हरकती आणि सूचना मागविल्या आहेतङ्क, अशी माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. ङ्कएकदा कायदा पारित होऊद्या, मग व्यवस्थित होणारङ्कङ्क, असंदेखील चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले आहेत.

चंद्रशेखर बावनकुळे नेमकं काय म्हणाले?

अधिसूचनेमध्ये काही आक्षेप आहेत. अधिसूचना अंतिम व्हायची आहे. अधिसूचनेतील आक्षेप घेताना, भुजबळ साहेब, सर्वांनी घेऊन, त्यानंतर अंतिम होण्यापूर्वी त्या अधिसूचनेला काही दुरुस्त्या करायच्या असतील तर सरकारचा अधिकार आहे. त्यामुळे त्याबद्दलची भूमिका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली आहेङ्क, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले आहेत. बावनकुळे यांच्या या वक्तव्यानंतर विविध चर्चांना उधाण आलं आहे. त्यांच्या वक्तव्यावर मनोज जरांगे पाटील यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे. ङ्कत्यांना जिथे आंदोलन करायचं आहे ते करावं. आम्हाला काय अडचण नाही. त्यांची भूमिका बदलणार नाही. सगळं व्यवस्थित होईल. एकदा कायदा पारित होईपर्यंत थांबा. सगळं व्यवस्थित होईलङ्क, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे यांनी दिली आहे.

मराठा आरक्षणाच्या अधिसूचनेला हायकोर्टात चॅलेंज

दरम्यान, सरकारने मराठा आरक्षणाच्या काढलेल्या अधिसूचनेला मुंबई हायकोर्टात आव्हान देण्यात आलं आहे. ओबीसी संघटनांकडून आरक्षणाच्या अधिसूचनेला हायकोर्टात आव्हान देण्यात आलं आहे. ओबीसी वेलफेअर फाऊंडेशनचे वकील मंगेश ससाणे यांनी मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. संविधानाविरोधात जाऊन सगेसोयरे यांची व्याख्या बदलण्यात येऊ नये, अशी भूमिका मंगेश ससाणे यांनी याचिकेत मांडली आहे. या याचिकेवर लवकरच मुंबई हायकोर्टात सुनावणी पार पडणार आहे.

# मुस्लिम राष्ट्रात २७ एकर परिसरात भव्य हिंदू मंदिर

## पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार उद्घाटन

■ प्रतिनिधी । नवी दिल्ली

अयोध्येत भव्य दिव्य राम मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा झाला. त्यानंतर आता मुस्लिम राष्ट्र असलेल्या संयुक्त अरब अमीरात (UAE) मध्ये भव्य मंदिर उभे राहिले आहे. २७ एकर परिसरात उभारण्यात आलेले हे मंदिर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी १४ फेब्रुवारी २०२४ रोजी या मंदिराचे उद्घाटन करणार आहेत. यावेळी त्यांनी भव्य सभाही होणार आहे. या कार्यक्रमाच्या तयारीसाठी भारतीय अधिकारी कामाला लागले आहेत. बीएपीएस स्वामीनारायण संस्थानकडून हे मंदिर उभारण्यात आले आहे.

इअझड स्वामीनारायण संस्थेने उभारले मंदिर

पंतप्रधान नरेंद्र मोदी १३ फेब्रुवारी रोजी अबू धाबीमधील शेख जायद स्टेडियममध्ये भारतीय जनसमुदायासाठी सभा घेणार आहेत. त्यानंतर १४ फेब्रुवारी रोजी णअए ची राजधानी दुबईत इअझड स्वामीनारायण संस्थानकडून उभारण्यात आलेल्या मंदिराचे उद्घाटन करणार आहे. यासदर्भात BAPS स्वामीनारायण संस्थेकडून प्रेस रिलीज दिले गेले आहे. त्यात म्हटले आहे की, ङ्कधार्मिक परिसराच्या निर्मितीचे काम पूर्ण झाले आहे. परम पावन महंत स्वामी महाराज आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी १४ फेब्रुवारी २०२४ रोजी मंदिराचे उद्घाटन करणार आहे. परंतु पंतप्रधानांच्या युएईमधील कार्यक्रमाची अजून अधिकृत घोषणा झाली नाही.




असे असणार मंदिर

२०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मंदिराचा पायभारणी समारंभ झाला होता. २७ एकरमध्ये पसरलेल्या हे मंदिर 'वैश्विक सद्भाव' म्हणून ओळखले जाणार आहे. २०१५ मध्ये जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी अबू धाबी दौऱ्यावर आले होते, त्यावेळी मंदिरास जमीन देण्याचे आश्वासन युएई सरकारने दिले होते. आता २७ एकर जमिनीवर गुलाबी बलुआ दगड आणि सफेद संगमरमरचा वापर करुन मंदिर उभारले गेले आहे. ५५,००० वर्ग मीटरमध्ये हे मंदिर झाले आहे.

वैदिक वास्तुकलेचा वापर

पश्चिम आशियातील हे सर्वात मोठे हिंदू मंदिर बांधण्यात आले आहे. त्यासाठी वैदिक वास्तुकलेचा वापर करण्यात आला आहे. मंदिरासाठी कोरीव काम आणि शिल्पेही भारतातच बनवली गेली आहेत. तसेच भारतातील अनेक कारागीरही अबुधाबीमध्ये मंदिरांच्या बांधकामात गुंतलेले आहेत. या मंदिराची उंची १०८ फूट आहे. यामध्ये ४० हजार घनमीटर संगमरवरी आणि १८० हजार घनमीटर वाळूचा खडक वापरण्यात आला आहे. त्याच्या बांधकामासाठी सुमारे ७०० कोटी रुपये खर्च केले जात आहेत.

# ज्ञानवापीच्या 'व्यासजी तळघरा'त ३१ वर्षांनी पूजा आणि आरती, आयुक्तांचीही उपस्थिती

■ प्रतिनिधी । वाराणसी

वाराणसीतल्या ज्ञानवापी परिसरातल्या व्यासजी तळघरात अखेर ३१ वर्षांनी पूजा करण्यात आली. तसंच आज सकाळीच अनेक लोक या ठिकाणी पूजा करण्यासाठी पोहचले आहेत. ज्ञानवापी परिसरातल्या असलेल्या व्यास तळघरात पहाटे दोन वाजता पूजा आणि आरती करण्यात आली. ३० वर्षांनी ही घटना घडली आहे. आम्ही कोर्टाच्या आदेशाचं पालन केल्याचं भक्तांचं म्हणणं आहे. तसंच वाराणासी जिल्हा न्यायालयाने दिलेल्या आद-शानंतर बॅरिकेडही हटवण्यात आले आहेत. ३१ जानेवारी या दिवशी न्यायालयाने हिंदू पक्षकार ज्ञानवापी परिसरात पूजा अर्चा करु शकतात असा आदेश दिला होता. हा आदेश म्हणजे मोठा दिलासा आहे असं हिंदू पक्षकारांनीही म्हटलं होतं. या आदेशानंतर पहाटे दोन वाजता व्यासजी तळघरात पूजा करण्यात आली.

मुस्लीम पक्षकार वरच्या कोर्टा जाणार

मुस्लीम पक्षकारांनी जिल्हा न्यायालयाच्या या निर्णयाला वरच्या न्यायालयात आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे. हिंदू पक्षकारांचे वकील मदन मोहन यादव यांनी पीटीआयला सांगितलं की जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश अजय कृष्ण विश्वेस यांनी व्यासजी तळघरात पूज करण्याचा अधिकार असल्याचा आदेश दिला आहे. त्यानंतरच इथे पूजा आणि आरती करण्यात आली. या तळघरात असलेल्या मूर्तींची पूजा आणि



आरती करण्यासाठी न्यायलयाने सात दिवसांची मुदत दिली होती. मात्र त्याच्या आतच या ठिकाणी पूजा आणि आरती करण्यात आली.

जितेंद्र नाथ व्यास यांनी काय म्हटलं आहे?

आम्हाला पूजा अर्चा करण्याचा अधिकार मिळाला याचा आम्हाला मनस्वी आनंद आहे. ज्ञानवापीच्या तळघरात आम्ही पूजा केली. देवाची पूजा आणि आरती करण्याचा अधिकार आम्हाला मिळाला आहे. व्यास कुटुंबीय आणि पाच पूजारी उपस्थित होते. तसंच आयुक्तही उप-स्थित होते. त्या सगळ्यांच्या उपस्थितीत आम्ही तळघरात पूजा आणि आरती केली असं जितेंद्र नाथ व्यास यांनी सांगितलं. जितेंद्र नाथ हे व्यास कुटुंबातले आहे. त्या ठिकाणी काशी विश्वनाथाचं मंदिरच आहे. ते स्वयंभू मंदिर होतं आहे आणि राहिल. तुम्ही ते झाकलंत तरीही ते मंदिरच आहे. भिंतींवर स्वस्तिक, कमळ यांच्या आकृत्या आहेत. हे हिंदू मंदिरच आहे असंही जितेंद्र नाथ व्यास यांनी म्हटलं आहे.

वाराणसी न्यायालयाने बुधवारी हिंदू भाविकांना ज्ञानवापी मशिदीच्या तळघरात प्रार्थना - पूजा करण्याचा अधिकार बहाल केला आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार हिंदू भाविक 'व्यासाचे तळघर' (व्यास का तहखाना) मध्ये पूजा करू शकतात. सध्या मशिदीतील हा भाग बंद ठेवला गेलेला आहे. जिल्हा प्रशासनाने पुढील सात दिवसांत हिंदूंना त्याठिकाणी पूजाअर्चा करण्याची व्यवस्था करून द्यावी, असेही निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

या निकालानंतर हिंदू पक्षकारांचे वकील विष्णू शंकर जैन यांनी एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, व्यासाचे तळघर येथे हिंदूंना पूजाअर्चा करण्यासाठी न्यायालयाने परवानगी दिली आहे. आता जिल्हा प्रशासनाने सात दिवसांच्या आत तिथे व्यवस्था करून द्यावी, जेणेकरून तिथे प्रत्येकाला पूजा करण्याची संधी मिळेल. यानिर्णयानंतर हिंदू पक्षकारांनी न्यायालयाबाहेर आनंद व्यक्त केला.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी १९ फेब्रुवारीला साताऱ्यात, शिवसन्मान पुरस्काराने सन्मानित केले जाणार

■ प्रतिनिधी । वाई

साताऱ्यातील छत्रपती शिवप्रभूंच्या वंशजांच्या वतीने व शिवभक्तांच्या वतीने देण्यात येणारा पहिला शिवसन्मान पुरस्कार यावर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जाहीर झाला आहे. साताऱ्यातील छत्रपती शिवप्रभूंच्या वंशजांच्या वतीने व तमाम शिवभक्तांच्या वतीने शिवसन्मान पुरस्कार यंदाच्या वर्षापासून सुरू करण्यात आला आहे. येत्या छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिवशी १९ फेब्रुवारीला सातारा येथे भव्य दिव्य सोहळ्यात हा पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे.सातारा सैनिक



स्कूलच्या मैदानावर हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने या जागेची पाहणी खासदार उदयनराजे भोसले, जिल्हाधिकारी जितेन्द्र डुडी, पोलीस अधीक्षक समीर शेख, सातारा पालिका प्रशासक तथा मुख्याधिकारी अभिषित बापट व इतर विभागाच्या सर्व आधिकाऱ्यांनी केली. यावेळी सुनील काटकर, उपनगराध्यक्ष मनोज शेंडे, काका धुमाळ, पंकज चव्हाण, विनीत पाटील व इतर सहकारी उपस्थित होते.

# गेली ३८ वर्षे शासकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे पुनर्वसनाचा प्रश्न सुटत नसल्याने प्रशासनाचा निषेध करत शेवा कोळीवाडा ग्रामस्थ जेएनपीएच्या कामगार वसाहतीला लागून असलेल्या मौजे जसखार व फुंडे येथील जमिनीचा ताबा घेणार

■ प्रतिनिधी । उरण

दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजीच्या प्रजासत्ताक दिनी उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा येथील श्री हनुमान मंदिरात झालेल्या विस्थापितांनी घेतलेल्या बैठकीत मा.सरबानंद सोनोवाल- केंद्रीय बंदर मंत्री यांनी दि.१५/१२/२०२३ रोजी जेएनपीए (जेएनपीटी )च्या कामगार वसाहतीला लागून असलेल्या मौजे जसखार व फुंडे येथील जमिनीत शेवा कोळीवाडा गावातील २५६ कुटुंबांचे ३८ वर्षा पुर्वी शासनाचे माप दंडाने मंजूर असलेल्या पहिलेच पुनर्वसनाला मंजूरी दिली आहे.त्या नुसार पुनर्वसनाचे काम करण्यास जेएनपीटी (जेएनपीए )ने दि.३/०१/२०२४ रोजीचे पत्राने जिल्हाधिकारी रायगड यांना सांगीतलेले आहे.जिल्हाधिकारी रायगड यांनी दि.२६/१/२०२४ पुर्वी नवीन जमिनीचे गाव नमुना नंबर सातबारा तयार करुन देण्याचे कबूल केले होते.ते देण्यासाठी एक आठवड्याचा वेळ बैठकीत दिलेला आहे. नवीन जागेचा गाव नमूना सातबारा देवो अथवा न देवो ४/२/२०२४ रोजी नवीन जागेत राहायला जायचा एक मताने विस्थापितांनी निर्णय घेतलेला आहे.

उरण तालुक्यातील जे. एन.पी. टी आंतर राष्ट्रीय बंदर(जेएनपीए ) प्रकल्पासाठी शेवा कोळीवाडा गावातील जमीनी संपादित करण्यात आल्या.जमीन संपादन करताना या जूना शेवा कोळीवाडा गावातील नागरिकांना उरण तालुक्यातील मौजे बोरीपाखाडी येथे हनुमान कोळीवाडा येथे शासनाने गेली ३८ वर्षे संक्रमण शिबिरात ठेवले आहे. शासनाने शेवा कोळीवाडा गावाचे कायदेशीर पहिलेच पुनर्वसन केलेले नाही. आणि हनुमान कोळीवाडा गावातील सर्व घरांना वाळवी लागली आहे. हे घरे राहण्या लायक नाही असा अहवाल शासनाने नेमलेच्या टाटा संस्थेच्या समितीने शासनाला कळविले होते.मात्र येथे नागरिक जीव मुठीत धरून आजही जिवन जगत आहेत.गेली ३८ वर्षापासून येथील नागरिक पुनर्वसनच्या प्रतीक्षेत आहेत.

मात्र अजूनही, आजतागायत पुनवर्सन न झाल्याने हनुमान कोळीवाडा ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. त्यातच हनुमान कोळीवाडा गाव व ग्रामपंचायत हनुमान कोळीवाडा हे बेकायदेशीर आहेत हे माहिती अधिकारातून सिद्ध झाले आहे. शासकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे गेली ३८ वर्षे हा प्रश्न सुटला नाही.आणी गेली ३८ वर्षे मुद्दामून हा प्रश्न रेंगाळत ठेवल्याने ग्रामस्थांचे योग्य



जागी पुनर्वसन होत नसल्याने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी ४ फेब्रुवारी २०२४ रोजी जेएनपीए (जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी )च्या कामगार वसाहतीला लागून असलेल्या मौजे जसखार व फुंडे येथील जमिनीचा ताबा घेऊन घरे बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे.

# ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनूज जिंदल यांची एम एस आरडिसीच्या मॅनेजिंग डायरेक्टर पदी बदली!



**प्रतिनिधी | कल्याण**

आपल्या एक वर्षाच्या कार्यकाळात ठाणे जिल्हा परिषदेत आपल्या कार्य कर्तृत्वाचा वेगळा ठसा उमटविणारे २०१७बॅंच चे आईएएस अधिकारी मनूज जिंदल यांची एम एस आरडिसीच्या जॉंईन मॅनेजिंग डायरेक्टर पदी बदली झाली आहे. एक कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून त्यांची जिल्ह्यात ओळख निर्माण झाली होती.

महाराष्ट्रात ठाणे जिल्हा हा २नंबरचा मानला जातो, या जिल्ह्याचे शहरी व ग्रामीण असे दोन भाग पडतात, या जिल्ह्यात एक वर्षांपूर्वी मनूज जिंदल यांची जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली,२०१७च्या बॅंचचे आईएएस हे अधिकारी युप-ीएससी एनडीए परीक्षेत ऑल इंडिया मधून१८व्या रॅंकने उर्तीण झालेले या अधिका-यानी पदभार स्विकारताच मोठ्या प्रमाणात कामाला सुरुवात केली, शहापूर, मुरबाड, या मागास तालुक्यावर विशेष लक्ष केंद्रित केले, कुपोषण, पाणी पुरवठा, घरकुल योजना आदी बाबतीत स्वतः जातीने पाठपुरावा केला.स्वच्छता अभियान, जलजीवन मिशन, मोदी आवास, सर्वे इत्यादी मध्ये ते नेहमी अग्रेसर राहिले, कातकरी वाडी, आदीवासी वस्ती, मध्ये भेटी देऊन अडचणी समजून त्या दूर केल्या, इतकेच नव्हे तर कल्याण तालुक्यातील म्हारळ ग्रामपंचायत हद्दीतील कातकरी वाडी येथील ३/२चा प्रस्ताव मंजूर करून घेण्यासाठी त्यानी अतोनात मेहनत घेतली व अखेरीस मंजुरी मिळाली.

अतिवृष्टी व पुर परिस्थितीत प्रत्येक पंचायत समितीच्या गटविकास अधिका-यांना यंत्रणेसह उप-स्थित राह्याला सांगून शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहचते की नाही यावर लक्ष ठेवले व मार्गदर्शन केले. त्यांच्या कार्यकाळात जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वर जबरदस्त वचक व तसेच त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी वेळ दिला. कोणत्याही शासकीय योजना अथवा अभिमान राबविण्यात ठाणे जिल्हा राज्यात नेहमी अग्रेसर राहिला. यातून त्यांची कार्य तत्परता व कर्तव्यनिष्ठता दिसून आली.

अशा या चांगल्या अधिका-याची अचानक एम एस आरडिसीच्या जॉंईन मॅनेजिंग डायरेक्टर पदी बदली झाली आहे. त्यांना अजून काही वर्षे कालावधी मिळाला असता तर त्यांनी ठाणे जिल्हा यशाच्या उंच शिखरावर पोहचला असता, परंतु दुर्दैवाने तसे झाले नाही. त्यांच्या बदलीमुळे एका चांगल्या आईएएस अधिकां-याची पोखळी भरून निघेल का?हा प्रश्न उपस्थित होत आहे.

**प्रतिक्रिया**
**मा श्री मनूज जिंदल, (माझी मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद)-ही बदली मला अनपेक्षित आहे, पण शासनाच्या मर्जीपुढे काय?त्यांनी मला एम एस आरडिसीचे काम करण्याची संधी दिली आहे.**

# खानगांव नजिक व उगांव खरेदी-विक्री केंद्रांवर शुक्रवार पासुन द्राक्षेमणी लिलावास सुरूवात-बाळासाहेब क्षिरसागर

**प्रतिनिधी | लासलगांव**

खानगांव नजिक व उगांव परीसरातील द्राक्षे उत्पादक शेतकरी बांधवांच्या सोईसाठी याही वर्षी लास-लगांव बाजार समितीच्या खानगांव नजिक व उगांव येथील तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रांवर शुक्रवार (दि. ०२ फेब्रुवारी) पासुन द्राक्षेमणी लिलाव सुरू होणार असल्याची माहिती लास-लगांव बाजार समितीचे सभापती बाळासाहेब क्षिरस-ागर यांनी दिली.

खानगांव नजिक व उगांवसह परीसरातील नांदगांव, डोंगरगांव, रूई, धानोरे, कोळगांव, खेडलेझुंगे, धारणगांव वीर, धारणगांव खडक, नांदुरमध्यमेश्वर, गाजरवाडी, नैताळे, सोनेवाडी, श्रीरामनगर, शिवरे, शिवडी, खेडे, वनसगांव, खडक माळेगांव, सारोळे खुर्द, रानवड आदि गावांमध्ये शेतक-यांनी मोठ्या प्रमाणावर द्राक्षांची लागवड केलेली असल्याने त्यांची मालविक्रीची सोय जवळच निर्माण व्हावी म्हणुन लास-लगांव बाजार समितीतर्फे दरवर्षी उगांव, खानगांव नजिक व नैताळे येथे द्राक्षेमणी शेतीमालाचे खरेदी-विक्री केंद्र सुरू केले जाते. सदर केंद्रांस परीसरातील शेतकरी व व्यापारी बांधवांकडुन दरवर्षी चांगला प्रतिसाद मिळत असल्याने यावर्षी खानगांव नजिक व उगांव खरेदी-विक्री केंद्रावर शुक्रवार (दि. ०२ फेब्रुवारी) पासुन द्राक्षेमणी या शेतीमालाचे लिलाव सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तरी परीसरातील शेतकरी बांधवांनी खानगांव नजिक व उगांव येथील खरेदी-विक्री केंद्रावर शुक्रवार (दि. ०२ फेब्रुवारी) पासुन दररोज दुपारी ०४.०० वा. आपला द्राक्षेमणी हा शेतीमाल योग्य प्रतवारी करून विक्रीसाठी आणावा. वजनमापानंतर लगेच रोख पेमेंट देण्याची व्यवस्था बाजार समितीने केलेली असुन द्राक्षेमणी खरेदी करण्यासाठी जास्त व्यापारी इच्छुक असल्याने स्पर्धात्मक



बाजारभावामुळे शेतक-यांना योग्य बाजारभाव मिळण्यास मदत होणार आहे.

तरी शेतकरी बांधवांनी आपला द्राक्षेमणी हा शेतीमाल बाजार समितीच्या खरेदी-विक्री केंद्रांवरच विक्री करावा असे आवाहन सभापती बाळासाहेब क्षिरसागर व उपसभापती गणेश डोमाडे यांनी केले असुन बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात विना-परवाना शिवार खरेदी करणा-या द्राक्षेमणी खरेदीदारांवर कायद्यातील तरतुदीप्रमाणे कठोर कारवाई करण्याचे आदेश बाजार समिती प्रशासनाला देण्यात आलेले आहे.

तसेच बाजार समितीच्या खानगांव नजिक व उगांव येथील तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रावर द्राक्षेमणी खरेदीस इच्छुक असलेल्या व्यापा-यांनी लायसेन्सबाबतच्या सर्व अटी पुर्ण केल्यास संबंधित व्यापा-यांना तात्काळ लायसेन्स देऊन सदर खरेदी-विक्री केंद्रावर पॅकींग व साठवणुकीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी बाजार समितीच्या लासलगांव मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन बाजार समितीचे सचिव नरेंद्र वाढवणे यांनी केले आहे.

# जिजाऊ संघटनेच्या कल्याण प्रमुख नम्रता ठाकरे यांना एकविरा कला संस्था पनवेल यांच्या कडून 'भुमीकन्या,पुरस्कार!

**प्रतिनिधी | कल्याण**



संपूर्ण महाराष्ट्रात अनेक सामाजिक, सांकृतिक, आणि आर्थिक क्षेत्रात भरीव व समाजपयोगी, लोकोपयोगी कामे करणाऱ्या जिजाऊ या सामाजिक संघटनेच्या कल्याण प्रमुख तथा केलणी कोलम येथील रहिवासी असलेल्या सौ नम्रता ज्ञानेश्वर ठाकरे यांना रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील'एकविरा कला संस्था तसेच गायक, दिग्दर्शक तेजस पाटील यांच्या वतीने 'भुमीकन्या२०२४हा पुरस्कार मिळाला असून यामुळे जिजाऊ संघटनेसह विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

कल्याण तालुक्यातील केलणी कोलम ग्रामपंचायत हद्दीतील नम्रता ठाकरे या काही वर्षांपासून जिजाऊ या सामाजिक संघटनेत काम करत आहेत. संपूर्ण कल्याण, मुरबाड, शहापूर, आदी तालुक्यातील गोरगरीब, कष्टकरी, आदिवासी, शेतकरी, कष्टकरी यांच्या साठी नम्रता ठाकरे या सतत कार्यरत असतात. त्यांचे प्रश्न, अडचणी, समस्या, सोडवण्यासाठी त्या नेहमी आघाडीवर असतात, संघटनेच्या माध्यमातून मदत, महिला सक्षमीकरण, वृक्षलागवड, विविध शासकीय योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी त्या मदत करतात. त्यामुळे त्या सर्व परिचित असून त्यांच्या या कार्याची दखल घेऊन रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील एकविरा कला संस्था व गायक, दिग्दर्शक तेजेस पाटील यांच्या तर्फे'भुमीकन्या पुरस्कार२०२४,हा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला .यावेळी संस्थेचे तेजेस पाटील, वसत शेलवली परिसरातील सामाजिक कार्यकर्ते मधू राणे आदी मंडळी उपस्थित होते.तर भुमीकन्या पुरस्कार मिळाल्याबद्ल जिजाऊ संघटनेचे निलेश सांबरे, व इतर पदाधिकारी तसेच जनाधार निर्भीड पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय कांबळे आदीनी सौ ठाकरे यांचे अभिनंदन केले आहे.

# ब्रह्मा कुमारी घाटकोपर सबझोनचा तपोत्सव कार्यक्रम...

## सर्वांना आनंद द्या,त्यामुळे आनंद द्विगुणीत होतो - डॉ.राहुल बोधी महाथेरो

**प्रतिनिधी | मुंबई**

सर्वांना आनंद द्या. त्यामुळे आनंद द्विगुणीत होतो असे प्रतिपादन भीखू संघाज युनायटेड बुद्धीस्ट मिशनचे सर्वेसर्वा डॉ. राहुल बोधी महाथेरो यांनी घाटकोपर येथे केले. ब्रम्हाकुमारीज योग भवन घाटकोपर सबझोन यांच्या विद्यमाने २५ वा २५ पेक्षा अधिक वर्षे योगी जी-वनाची पूर्ण केली त्या ३०० राजयोगींचा तपोत्सव कार्यक्रम घाटकोपर येथील ब्रम्हाकुमारी योग भवन येथे रविवारी आयोज़ित करण्यात आला .त्याप्रसंगी डॉ. राहुल बोधी बोलत होते. कार्यक्रमास भाजपाचे मुंबई चे सेक्रेटरी प्रविण छेडा, आमदार राम कदम ,समाजसेवक अर्जुन मुंडा आदि प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ब्रम्हाकुमारी राजयोगिनी डॉ. नालिनी दिदि जी , शकु दीदी जी , भ्राता निकुंज जी यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

प्रविण छेडा यांनी ३०० तपस्वींचे स्वागत केले. या अगोदर घाटकोपर मधून ब्रम्हाकुमारी पीस पार्क येऊन शोभा यात्रा काढण्यात आली. ही शोभा यात्रा ब्रम्हाकुमारी भवन योग भवन येथे सुरू होऊन एम जी रोड, घाटकोपर स्टेशन पूर्व, आर जी मेहता मार्ग, हिंगवाला एक्स स्टेशन रोड, रामनारायण मार्ग, प्र. एस. गावडे मार्ग, स्वामी समर्थ मार्ग येथून फिरुन पुन्हा ब्रम्हाकुमारी पीस पार्क येथे आली. या यात्रेत ४० सुशोभित रथ सामिल झाले होते. यात्रेत लेझीम आदि क्रीडा खेळ खेळण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन ८२ वर्षाच्या ब्रम्हाकुमारीज डॉ नलिनी दिदि यांनी करुन गृहस्थीमधून राहून आपण योग साधना करू शकतो असे स्पष्ट केले. यावेळी ३०० तपस्वींचा सन्मान करण्यात आला.



शेवटी महाप्रसाद देण्यात आला.

# नेरुळ मधील दोन अनधिकृत इमारती न्यायालयाच्या निर्देशानुसार मनपाने केल्या रिकाम्या

**प्रतिनिधी | नवी मुंबई**



नवी मुंबई महान-गरपालिका अतिक्रमण विभागातर्फे नेरुळ मधील अनधिकृत इमारती त्रिमूर्ती पार्क आणि कृष्णा कॉम्प्लेक्स रिकामी करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले होते. या आदेशाचे पालन करत अतिक्रमण उपायुक्त राहुल गेठे यांच्या नेतृत्वाखाली या दोन्ही इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत. नवी मुंबई मनपाच्या मैदानासाठी राखीव भूखंडावर पाच मजली कृष्णा कॉम्प्लेक्स आणि सहा मजली त्रिमूर्ती पार्क या इमारती अनधिकृतपणे उभारण्यात आल्या होत्या. यावर आता न्यायालयाच्या निर्देशानुसार धडक कारवाई करत इमारती खाली करण्यात आल्या असून घरे सील करण्यात आली आहेत.

*इमारतीवर कारवाई करण्यासाठी पोलीस, पाणी पुरवठा विभाग, महावितरण कर्मचारी, अतिक्रमण इंजिनियर व इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मोठा फौजफाटा होता. यावेळी शांतपणे सर्वांना सांगत दोन्ही इमारती खाली करण्यात आल्या तसेच ज्यांनी रूम खाली केल्या नाही त्यांना मनपा काही मदत लागली तर करणार आहेत कारण काही घरात आजारी नागरिक, आबला वृद्ध वयस्कर व्यक्ती आहेत त्यांना मॅन पावर किंवा काही सुविधा लागली तर मदत करणार असल्याचे राहुल गेटे यांनी सांगितले.

# अंबरनाथमधील प्राचीन शिवमंदिराच्या आवारात ध्वनिक्षेपण,वास्तू शिल्पांवर मुर्तींवर होणारा दुग्धाभिषेक, नारळ फोडणे होमहवन बंद करण्याची मागणी

**प्रतिनिधी | उल्हासनगर**

अंबरनाथमधील शिलाहार काळातील उत्कृष्ठ स्थापत्य कलेचा नमुना असलेल्या शिवमंदिराच्या शिल्पांची झिज होत असून त्यावरील शिल्प निखळल्याचा प्रकार समोर आला आहे. मंदिरातील शिल्पांना नियमीत पुजाविधी आणि उपक्रमांमुळे धोका पोहोचत असल्याचे ज्येष्ठ प्राच्यविद्या अभ्यासक डॉ. कुमुद कानिटकर यांनी सांगितले आहे. त्यानंतर मंदिराच्या आवारात ध्वनिक्षेपण यंत्रणा, वास्तू शिल्पांवर तसेच मुर्तींवर होणारा दुग्धाभिषेक, नारळ फोडणे आणि होमहवन या सर्वांमुळे असे होत असल्याचे त्यांनी सांगितले .

अभ्यासक यांच्या अभ्यासात या मंदिरातील शिल्पांना नियमीत पुजाविधी ,नारळ फोडणे, होमहवन करणे साऊंड सिस्टीम लावणे या सर्व उपक्रमांमुळे धोका पोहोचत असल्याने ते सर्व त्वरित बंद करण्याचे आदेश आपण देण्यात द्यावे.जेणे करून मंदिरातील शिल्पाना धोका पोचणार नाही तसेच तर जसे आहेत तसेच शाबूत राहतील.अशी मागणी समाजसेवक फड प्रशांत चंदनशिव यांनी भारतीय पुरातत्व विभाग, मुख्यमंत्री , प्रांत अधिकारी, ठाणे जिल्हाधिकारी , तहसीलदार यांना ईमेल द्वारा निवेदन पाठवुन केली आहे.

# कसारा रेल्वे स्थानकात सरकता जिना आणि लिफ्टला मिळाली मंजुरी

**प्रतिनिधी | कल्याण**

कल्याण-कसारा रेल्वे पॅसेंजर्स वेल्फेअर असोसिएशन संघटना प्रमुख शैलेश राऊत आणि त्यांच्या सहका-यांनी केलेल्या मागणीची रेल्वे प्रशासनाने नुकतीच दखल घेतली आहे.मध्य रेल्वेच्या कसारा स्थानकातून येजा करणाऱ्या प्रवाशांची जिना चढ उतर करण्यात होणारी दमछाक आता संपुष्टात येणार आहे.कसारा स्थानकात नव्याने उभारण्यात आलेल्या पादचारी पुलाला सरकता जिना आणि लिफ्टची जोड मिळणार आहे.हे काम लवकरात लवकर पूर्ण करणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासन सूत्रांकडून मिळाली आहे.

मध्य रेल्वेच्या कसारा स्थानकातील जुना पादचारी पूल तोडुन त्याला पर्याय म्हणून मुंबई बाजूने नवीन उंच पादचारी पुलाची निर्मिती करण्यात आली.मात्र त्या पुलाला सरकता जिना आणि लिफ्ट बसविण्यात आली नसल्याने प्रवाशांना जिना चढ उतर करताना मोठी कसरत करावी लागत आहे.त्यात प्लॅटफॉर्म क्रमांक १ व २ मधील पुलाचे जिने अगदीच अरुंद असल्याने लोकल आल्यानंतर चढ उतार करणाऱ्या प्रवाशांची प्रचंड कोंडी होते.त्यात आबालवृद्ध,महिला व लहान मुलांची फारच तारांबळ उडते.मध्य रेल्वेच्या कसारा स्थानकातील वाढत्या गर्दीचा विचार करता व प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन कसारा स्थानकात सरकता जिना अर्थात इस्क्लेटरची व्यवस्था करावी;अशी रास्त मागणी कल्याण-कसारा रेल्वे पॅसेंजर्स वेल्फेअर असोसिएशन संघटनेने मागच्या महिन्यात मुंबई मंडळाच्या रेल्वे अधिकाऱ्यांकडे केली होती.अखेर प्रवासी संघटनेच्या या मागणीला यश आले असून कसारा स्थानकातील फलाट क्रमांक १ व २ येथे लिफ्ट बसवण्याच्या कामाचे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले असून लवकरच लिफ्टचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.तसेच फलाट क्रमांक ४ साठी सरकता जिना मंजूर झाला असून आराखडा बनवण्याचे काम चालू आहे.येत्या काही महिन्यात प्रवाशांच्या सोयीसाठी सरकता जिना पादचारी पुलाला जोडून कसारा स्थानकात उतरवला जाईल.अशी माहिती प्रवाशी संघटनेने दिली.कसारा स्थानकातील मंजूर कामांप्रमाणेच कल्याण कसारा मार्गावरील खर्डी,आसनगाव,खडावली,टिटवाळा आदी स्थानकातील मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे कल्याण-कसारा रेल्वे पॅसेंजर्स वेल्फेअर असोसिएशन संघटनेचे अध्यक्ष शैलेश राऊत व सल्लागार जितू विशे यांनी कळविले आहे.

# सारा अकाश ट्रस्ट तर्फे आदिवासी बांधवांना औषध फवारणी पंप वाटप

**प्रतिनिधी | मुरबाड**

सारा अकाश ट्रस्टच्या माध्यमातून मुरबाड तालुक्यातील २५ गावातील १०० आदिवासी शेतकऱ्यांना औषध फवारणी पंप वाटप करण्यात आले.

करपटवाडी, पेजवाडी , वाकलवाडी ,भोईरवाडी , आवळेगांव , शिसेवाडी, डोंगरवीडी, बनाचीवाडी, झाडघर , कुडशेत , पारधवाडी, बांगारवाडी, काट्याचीवाडी , उंबरवाडी , वाघाचीवाडी , खपाचीवाडी , आवळेगांव , उदालडोह, दिवाणपाडा ,मोरोशी , खुटल, बोरवाडी , सुकाळवाडी , मानिचीवाडी , धारखिंड, या आदिवासी गावातील गरिब गरजू बागायतदार शेतकरी बांधवांना ५० टक्के सबसिडीवर फवारणी पंप वाटप करण्यात आले.

फवारणी पंप वाटपाच्या कार्यक्रमासाठी सारा अकाश ट्रस्ट चे अध्यक्ष , मुरबाड तालुका कृषी विभागाचे पर्यवेक्षक नरेंद्र वसुकर , कृषी सेवक लक्ष्मण वाघ , टोकावडे वनविभागाचे सचिन मुळे , सारा अकाश ट्रस्टचे सचिव नथु पारधी व चंदर पारधी, भोरांडे येथील वैभव सरोगदे, वैशाखरे ग्रामपंचायत माजी सरपंच बुधाजी पारधी आदि मान्यवर उपस्थित होते शेतकरी बांधवांना पंप दील्याबद्दल पांडुरंग भला यानी आभार मानले

# उल्हासनगर शहर हे होणार अर्धे खंडर

**प्रतिनिधी | उल्हासनगर**

उल्हासनगर शहरातील धोकादायक इमारतीचा प्रश्न तसाच पडुन आहे. या इमारतीबाबत शासन देखील अनुकूल नसल्याचे दिसुन येते तर शहरात पुनर्निमाणाच्या नावावर धोकादायक इमारती तोडणे सुरु आहे. शहरात कोणत्या ही कॅंप मध्ये गेले तर इमारती तोडताना दिसत असुन काही इमारतीचे काम सुरु असल्याचे दिसुन येत आहे. या इमारतींच्या तोडफोड व पुनर्निमाण चे कामे सुरु असल्याने अर्धे अधिक शहर खंडर होत चालले आहे.

उल्हासनगर शहरात धोकादायक इमारतीचा प्रश्न ऐरणीवर आला असुन एखादी इमारत कोसळली की शासन व महापालिका जागे होते. सर्वोतरी मदत करण्याची घो-षणा होते. नंतर मात्र ती घो-षणा हवेत विरुन जाते . दरम्यान शहरात असंख्य इमारती अनधिकृतपणे तयार होत आहे. चार ते पाच माळ्या ऐवजी सात ते आठ माळ्याच्या इमारती बिनधास्त पणे उभ्या होत आहेत. यातील बऱ्याच इमारती ह्या अनधिकृत तयार होत आहे. शहाड ब्रिज च्या बाजुला जवळपास ३० ते ३५ माळ्याची इमारत उभी झाली असुन यातील पाच माळे नक्कीच अनधिकृत असल्याचे समजते. हे सर्व महापालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत असुन या मध्ये लाखो रुपयाचा आर्थिक व्यवहार झाल्यावरच हे अनधिकृत इमारती व बांधकामे होत आहेत. उल्हासनगर शहरात रस्ते खड्डेमय झाले असुन दरवर्षी या खड्ड्यावर करोडो रुपये खर्च होतात, मात्र खड्डे बुजत नाहीत. या मध्ये शहरातील ठेकेदार मालामाल झाले असुन महापालिकेचा सार्वजनिक बांधकाम विभाग हा या ठेकेदारांसाठीच काम करत असल्याचे स्पष्ट होत आहे.

प्रभारी शहर अभियंता संदीप जाधव हे या ठेकेदाराचे भले करण्यासाठीच या विभागात कार्यरत असल्याचे दिसते. अशा बेजबाबदार अभियंत्यामुळे शहर बकाल झाले आहे. शहरात अमृत. २. योजने अंतर्गत कामे सुरु असुन शहरात रस्ते खोदुन ठेवले आहेत. त्यामुळे धुळीचे साम्राज्य पसरले आहे. दरम्यान धोकादायक इमारती व खोदलेले रस्ते यामुळेच अर्धे शहर खंडर झाले आहे.

# मराठा आरक्षणा साठी शासनाने काढलेल्या अध्यादेशाविरोधात हरकती साठी मुरबाड येथे जोरदार मोहिम सुरु

**प्रतिनिधी | मुरबाड**

मराठा समाजातील लोकांचा ओबीसीत समावेश करण्यासाठी राज्य सरकारने २६ जानेवारी काढलेल्या अध्यादेश विरोधात मुरबाड तालुक्यातील ओबीसी समाज एकवटला असून या अध्यादेश विरोधात हरकती नोंदविणे साठी जोरदार मोहीम सुरू करण्यात आली आहे

या अध्यादेशावर राज्य सरकारने १६ फेब्रुवारी पर्यंत ओबीसींच्या हरकती मागविल्या आहेत. ठाणे जिल्हात मोठ्या प्रमाणावर ओबीसी समाज असून सरकार विरोधात प्रचंड नाराजी पसरली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ओबीसी वर अन्याय होणार नाही असा शब्द दिला असतानाही अन्याय करणारा जी.आर काढल्याने मुरबाड मधिल ओबीसी समाज सघटना आक्रमक झाल्या आहेत. कुणबी समाज भवन येथे अध्यादेश विरोधात हरकती नोंदणी सुरु करण्यात आली आहे मंगळवारी पहिल्याच दिवशी शेकडो हरकती आल्या असल्याची माहिती देण्यात आली येत्या १६ फेब्रुवारी पर्यंत मुरबाड तालुक्यातुन हजारो हरकती राज्य मागास आयोगाकडे पाठविण्याचा निर्धार ओबीसी समाज संघटनांनी केला आहे. यासाठी लवकरात लवकर हरकती पाठविण्याचे आवाहन ओबीसी समाजा तर्फे करण्यात आले आहे.

राजपत्रावर हरकत घेण्यासाठी हरकत अर्ज स्वाक्षरी अभियानास सक्रिय पाठिंबा म्हणून कुणबी समाजबांधव श्री.सुरेश पष्टे ,पष्टे झेरॉक्स एस.टी.स्टॅंड मुरबाड यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून हरकतीचे तीन पानी शंभर फॉर्म फक्त दिडशे रुपयात उपलब्ध केले आहेत. ( पन्नास पैसे एका पानासाठी ) सदर फॉर्म घेवून आपले कुटुंबीय, मित्र, नातेवाईक , ग्रमस्थ यांच्या सह्या घेवून कुणबी भवन मुरबाड येथे किंवा पष्टे झेरॉक्स, एस.टी.स्टॅंड मुरबाड येथे जमा करण्याचे आवाहन केले आहे.

